महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२. २२६२२०२९/६२९१/२०३६ E-mail -jd.admin@mahakosh.in

क्र. संलेको २०१९ /प्रशा कोषा/ कार्या ५ /प्र.क्र. २३२३ / बाह्ययंत्रणा सफाईगार/ ५५५ दिनांक

प्रति, 04 MAY 2019

विषय:- बाहययंत्रणेद्वारे सफाईगाराच्या सेवा घेण्याबाबत.

संदर्भ:- १. शासन वित्त विभाग पत्र क्र. सेवाप्र-२०१३/प्र.क्र.१८५/ कोषा (प्रशा-३) दि.२४.१०.२०१८
२. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.०२.२०१६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयास ११ महिन्यासाठी दिनांक ०६.०५.२०१९ पासून बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी पद्धतीने सफाईगार पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्था / बेरोजगार संस्थांकडून मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

तरी संबंधितांनी आपले दरपत्रक या सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा / दरपत्रक प्रपत्रात भरुन बंद लिफाप्यात दिनांक १३.०५.२०१९ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत या कार्यालयात स्वत: सादर करावीत किंवा सदर वेळेत कार्यालयात मिळतील या प्रकारे पोस्ट / कुरीअर सेवेद्वारे पाठवावित. सदर दिनांकानंतर प्राप्त होणारी दरपत्रके दर प्रक्रियेसाठी विचारात घेतली जाणार नाहीत.

8/5/2019
(सुभाष भोर)
उपसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई.

सहपत्र : दरपत्रक नमुना व सर्वसाधारण अटी व शर्ती

**प्रत:-** १. सहायक संचालक (संगणक), लेखा व कोषागारे, मुंबई यांना विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी सस्नेह अग्रेषित.
२. कार्यालयाचे नोटीस बोर्ड.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

संचालनालय, लेखा व कोषागारे

मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,

३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्र. ०२२. २२६२२०२९/६२९१/२०३६ E-mail -jd.admin@mahakosh.in

**बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ ( सफाईगार ) पुरविणाऱ्या संस्थाकडून निविदा/दरपत्रक मागविणेबाबत.**

संचालनालय,लेखा व कोषागारे, मुंबई मार्फत एपीजी हाऊस (APEEJAY HOUSE) येथील घेतलेल्या भाडेतत्वावरील जागेकरीता एक सफाईगार भरण्यासाठी,बाह्ययंत्रणेमार्फत सफाईगार पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्थांकडून निविदा/ दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

निविदा/दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशिल,बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थाकरिता तसेच आवश्यक अटी,शर्ती इ .विषयक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ. पक्षकार :- करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार (ज्यांना काम सोपविले आहे) आणि सहसंचालक (कोषागारे), लेखा व कोषागारे, मुंबई हे राहतील.

**ब.सफाईगार उमेदवारासाठी अटी व शर्ती.**

| | |
|---|---|
| १ | दिनांक ३१.१०.२०१८ रोजी उमेदवाराचे वय हे ५० वर्षापेक्षा जास्त नसावे व १८ वर्षापेक्षा कमी नसावे. |
| २ | उमेदवारास मराठी व हिंदी भाषा अवगत असावी. |
| ३ | उमेदवार निर्व्यसनी असावा. |
| ४ | सफाईगाराची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता,कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी , अलिकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ व बँक खात्याचा तपशिल |

**क) कंत्राटी सफाईगाराची जबाबदारी**

| | |
|---|---|
| १ | सफाईगार कार्यालयाच्या गरजेनुसार कार्यालयात पूर्णवेळ हजर रहावे. |
| २ | साफसफाई करताना विद्युत दिवे हे गरजेप्रमाणे चालू व बंद करण्याची जबाबदारी सफाईगाराची राहील. सफाईगार प्रसाधनगृहामधील पाण्याचा वापर काटकसरीने करण्याबाबत काळजी घेतील. प्रसाधनगृहातील नळाची गळती होत असल्यास कार्यालयास अवगत करतील. |
| ३ | सफाईगाराने वक्तशीरपणे व नियमितपणे कार्यालयातील कामे करावीत. |
| ४ | सफाईगाराची वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्याचे उत्तरदायित्व हे कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेचे राहील. |
| ५ | कचऱ्याची विल्हेवाट महानगर पालिकेच्या प्रचलित नियमांनुसार लावण्याची जबाबदारी सफाईगाराची असेल. |
| ६ | सफाईगाराकडून कार्यालयातील सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे आढळून आल्यास त्यांना देय असलेल्या रकमेतून सदर रक्कम वसुल करण्यात येईल. |
| ७ | सफाईगाराने कार्यालयातील साफसफाईबाबत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशांचे पालन करावे. |

**ड. सफाईगाराला अनुज्ञेय असणारे पारिश्रमिक, भत्ते व त्यांचे प्रदान :**

| | |
|---|---|
| १ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने त्याच्या कामगारास अदा करावयाच्या पारिश्रमिकाची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + राज्य कामगार विमा योजना + कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम इत्यादी मिळून होणारी रक्कम यापेक्षा कमी असणार नाही. किमान वेतन कायद्यानुसार परिगणित रक्कम सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमुद केलेली आहे. पुरवठादारास किमान वेतन अधिनियमानुसार किमान वेतन व वरीलप्रमाणे दायित्वाच्या रकमा अंतर्भुत करुन रु.१२५२४/- प्रतिमाह प्रति उमेदवार इतकी रक्कम सफाईगाराला अदा करण्यासाठी मंजूर करण्यात येणार आहे. कंत्राटदाराने / पुरवठादाराने त्याच्या प्रशासकीय सेवेचा आकार (Administrative Service Charges) व वस्तू व सेवा आकार स्वतंत्रपणे विवरणपत्रात दर्शवावयाचे आहे. किमान वेतन व सेवा आकार रक्कम अशा एकत्रित रकमेनुसार न्युनतम दर असलेल्या कंत्राटदारास पात्र ठरविण्यात येईल. सदर रकमेवर नियमानुसार/शासनाने विहित केलेल्या दरानुसार वस्तु व सेवा कराची (GST) रक्कम अदा करण्यात येईल. वस्तु व सेवा कर (GST) अचूक नमुद करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. बोनसची रक्कम अधिनियमातील तरतूदीनुसार एक वर्षानंतर अदा करण्यात येईल. सेवापुरवठादाराकडून उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाला उपरोक्त देय असलेले कायदेशीर दायित्वाचा समावेश वेतनात अंतर्भूत असून संबंधित प्राधिकरणाकडे कायदेशीर दायित्व जमा करण्याची जबाबदारी सेवापुरवठादाराची राहील. व त्याबाबतची कागदपत्रे सेवापुरठवदार संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे वेळोवेळी जमा करील. |
| २ | महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयात कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह देयक सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल. |
| ३ | सफाईगाराचे मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित सफाईगाराच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे (Account Payee Cross Cheque)/NEFT/ECS व्दारे जमा करणे आवश्यक राहील. |
| ४ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी सफाईगारास दिलेल्या पारिश्रमिकाच्या / इतर भत्त्यांच्या धनादेशाची छायांकीत प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला / पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही. EPF/ESI वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल. |
| ५ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी सफाईगारास किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल. |
| ६ | कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची/ वस्तु व सेवाकराची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल. |
| ७ | व्यवसायकर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांचे राहील. |

**इ. दरपत्रक संबंधीच्या अटी व शर्ती :-**

वेतन दरपत्रकाचा विहित नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे. दरपत्रक प्रपत्रामध्ये कंत्राटदाराने संस्थेबाबतची माहिती नमुद करुन खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

| | |
|---|---|
| १ | सबंधित संस्था /अर्जदार ही खालील पैकी एकाकायद्यांतर्गत नोंदणीकृत असावी.(नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी.)<br>• मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम,<br>• भागीदारी संस्था अधिनियम,<br>• सहकारी संस्था अधिनियम<br>• कंपनी अधिनियम |
| २ | निविदा/दरपत्रक अर्जासोबत अनामत रक्कम रु.५,०००/- धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेचा) लेखा अधिकारी (र व का) संचालनालय,लेखा व कोषागारे, मुंबई यांचे नावाने देण्यात यावा. |
| ३ | दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून नियमानुसार आयकर व वस्तू व सेवा कर व इतर शासनाने लागू केलेल्या करांची वजा करण्यात येईल.यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ४ | वस्तु व सेवाकर कायद्यानुसार नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे. |
| ५ | मागील २ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय/निमशासकीय कार्यालयांना सफाईगार कंत्राटीतत्वावर पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. |
| ६ | कंत्राटदाराने / पुरवठादाराने नमूद केलेले दर हे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध / विधीग्राहय असतील. नमुद केलेले दर वस्तु व सेवा करासहित असतील. वस्तु व सेवा कर स्वतंत्रपणे नमुद करावा. |
| ७ | दरपत्रके शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. |
| ८ | पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे एकूण दरावरुन न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील. |
| ९ | प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत. |
| १० | पात्र कंत्राटदाराने / पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रुपये ५००/- चे मुद्रांक पेपर वर करारनामा करुन देणे आवश्यक राहील. |
| ११ | निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास / पुरवठादारास तात्काळ सुरक्षा ठेव (Performance Security) रुपये १०,०००/- चा धनाकर्ष ( मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा) लेखा अधिकारी (र व का), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे नावे द्यावा लागेल. करारनाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास , करारनाम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम मुक्त करण्यात येईल. |
| १२ | कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त केली जाईल. |
| १३ | कंत्राटदार / पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी लागू राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही. |
| १४ | संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदाधारकारा १ महिन्याची आगाऊ नोटीस देवून करारनामा रद्द करण्याचा / संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल. |
| १५ | सफाईगार वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. |
| १६ | सफाईगार वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. |

| | |
|---|---|
| १७ | सफाईगार रजेवर असल्यास पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. |
| १८ | उमेदवाराच्या सचोटी/चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल. |
| १९ | कायम स्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/ शासनाकडे /न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही,अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणे बंधनकारक. |

वर नमूद अटी व शर्तीची[(अ) व (ब)]पूर्तता करणाऱ्या संस्थाकडून निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहेत. निविदा अर्ज दिनांक ०६.०५.२०१९ ते १३.०५.२०१९ सायंकाळी ५.३० पर्यंत महाकोष https://www.mahakosh.gov.in ) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**ठिकाण: मुंबई.**
**दिनांक**

संचालक,लेखा व कोषागारे
**लेखा व कोषागारे, मुंबई**

# दरपत्रक प्रपत्र

| | | |
|---|---|---|
| १ | कंत्राटदाराचे संस्थेचे /कंपनीचे नांव पूर्ण पत्ता | |
| २ | संस्था/कंपनी/फर्म असल्यास | |
| | अ)नोंदणीचा तपशील | |
| | कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| ३ | संपर्काचा तपशील | |
| | अ)दूरध्वनी क्रमांक | |
| | ब) फॅक्सचा क्रमांक | |
| | क) भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | दुकान परवाना क्रमांक/प्रमाणपत्र (नुतनीकरणासह) | |
| ५ | EPF रजिस्ट्रशन क्रमांक | |
| ६ | ESIS रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| ७ | वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक | |

१. निविदा/दरपत्रक मंजूर करण्याचे सर्व अधिकारी खरेदी समितीकडे राखीव आहेत हे मला मान्य आहे.

२. या निविदेतील/दरपत्रकातील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

निविदाधारकाची सही

रबर स्टँपसह

# काळया यादीत न टाकण्याबाबत/बंदी न टाकण्याबाबत प्रमाणपत्र

मी/आम्ही श्री. व श्री मालक/संचालक(संस्थेचे नांव) शपथपूर्वक घोषित करतो की उक्त नमुद संस्था वर्षापासून इमारतीचे अंतर्गत साफसफाईचे काम करत आहे. साफसफाईचे काम समाधानकारकरित्या पार न पडल्यामुळे कोणत्याही केंद्र शासकीय, राज्य शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयाद्वारे मेसर्स (संस्थेचे नांव) या संस्थेस काळया यादीत टाकण्यात आलेले नाही अथवा संस्थेकडून इमारतीचे अंतर्गत साफसफाईचे काम करुन घेण्यात बंदी घालण्यात आलेली नाही.

स्वाक्षरी (शिक्क्यासह)

# विवरणपत्र

**Zone - I Commercial Cost Brake Up for 30 Days 8 Hrs Duty as per Minimum Wages Under Shop & Establishment Act.**

| Particulars | % | Sweeper |
|---|---|---|
| **Basic** | | 5000 |
| Special allowance DA | | 3645 |
| **SUB TOTAL** | | **8645** |
| HRA 5% | 5.00% | 432 |
| Washing Allowance | | |
| other Allowance | | 500 |
| **GROSS** | | **9577** |
| PF 13% | 13.00% | 1124 |
| ESIC 4.75% | 4.75% | 455 |
| Bonus 8.33% | 8.33% | 720 |
| Leave (Basic+DA*21/26/12) | 6.00% | 519 |
| National Holiday 1.28% | 1.28% | 123 |
| MLWF | | 6 |
| **Sub Total Amt ➡ A** | | **12524** |
| Service Charges | | (संस्थेने नमुद करावे रुपयांमध्ये) |
| **Total (12524 + Service Charges) ➡ B** | | |
| **GST (शासनाने विहित केलेल्या दरानुसार)** | | |
| **CTC ( B + GST)** | | |
| Total inwords (Rs.--------------- only) included GST | | |
| **Net Salary** | | |
| P F 12% | 0.12 | 1037 |
| ESIC 1.75% | 0.02 | 168 |
| P TAX | | 200 |
| Total Deduction | | 1405 |
| **NET SALARY (In hand salary)** | | **8172** |

टिप :- किमान वेतन कायद्यानुसार सफाईगार यांचे दरमहा किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजना + उपदान असे एकूण परिश्रमिक रु. १२५२४/- वरीलप्रमाणे प्रति माह प्रति कंत्राटदारास सफाईगाराच्या किमान वेतन व दायित्वासाठी अदा करण्यात येणार आहे. पुरवठादाराने प्रति सफाईगार प्रतिमाह सेवा आकार रक्कम (Service Charges) वस्तू व सेवा कर (GST) रुपये स्वतंत्रपणे वरील तक्त्यात नमुद करावा. टक्केवारी मध्ये नमुद केल्यास निविदा नाकारण्यात येईल. तसेच बोनस अधिनियमातील तरतूदीनुसार बोनसची रक्कम एक वर्ष झाल्यानंतर अदा करण्यात येईल. पुरवठादाराने सफाईगार दायित्वाच्या वजाती केल्यानंतर रु.८१७२/- इतके किमान वेतन अदा करणे बंधनकारक राहील. सर्वात न्युनतम सेवा आकार (Service Charges )नमुद करणाऱ्या कंत्राटदारास पात्र ठरविण्यात येईल. वस्तु व सेवा कराची (GST) रक्कम शासनाने विहित केलेल्या दरानुसार अदा करण्यात येईल.